**अत्यंत तातडीचे**

Phone No:- 022- 22708738
22618987
Email:- mismumuniversity@gmail.com

सांख्यिकी कक्ष,
फोर्ट, मुबंई, -४०००३२,
UDSTAT/ICD/ 28 /2014
दि. २३ मे २०१४.

# M O S T  U R G E N T

**प्राचार्य ,**

विषय:- उच्च शिक्षण संचालनालयासाठी विकसित केलेली एमआयएस प्रणाली तातडीने अमंलबजावणीत आणून अंतिम अहवाल प्रकाशित करण्याबाबत...
(व्यवस्थापकीय माहिती प्रणाली (MIS).
(संबधीत माहिती कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व इतर नॉन एआयसीटीई यांच्याशी निगडीत).

संदर्भ :- १) मा. संचालक,उ.शि. महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे पत्र कं. उशिसं/सांख्यिकी/२०१३-१४ एमआयएस/४१२८/दि.१७-५-१४ च्या अनुषंगाने दि.२१-५-१४ रोजी झालेली आढावा बैठक.
२) **क.सहस/ मुंवि/३-लेखा/ MIS /२०१३-१४/१२३७ दि. २२-५-१४. (प्रत संलग्न).**

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्रानुसार तसेच घेण्यात आलेल्या कार्यशाळेमधील सुचनेप्रमाणे आपल्या महाविद्यालयांची सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षातील माहिती http://mis.dhepune.info/login.aspx या पोर्टलवर अपलोड करण्याबाबातची कार्यवाही विहित वेळापत्रकापुसार पुर्ण करून घेण्याबाबत आपणांस सुचित करण्यात आले होते. सदरची महिती शासनास वेळोवेळी धोरण तयार करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी अत्यंत महत्वाचे असते.

असे असले तरी अदयाप काही महाविद्यालयांनी MIS पोर्टलवर माहिती नोंद केलेली नाही, तसेच काही महाविद्यालयांनी संपुर्ण माहिती भरल्याची नोंद केली नसल्याचे मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे, यांच्या निदर्शनास आले आहे. या विषयी पुणे येथे मा. संचालकाच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीमध्ये **दि. २८-५-२०१४** पर्यत माहिती भरण्यासाठी अंतिम मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार ज्यांनी अदयाप नोंद केली नाही किंवा ज्यांची माहिती अपुर्ण आहे, अशा महाविद्यालयांनी आपली माहिती विहित कालमर्यादित पुर्ण करावी तसेच ज्यांनी माहिती भरली आहे त्यांनी पुनश्च: एकदा आपली माहिती पडताळून अचुक व परिपुर्ण आहे का? याची खातर जमा करावी.

सदर पोर्टलवर भरलेली माहिती अचुक व परिपुर्ण असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडलेल्या नमुन्यात आपल्या महाविद्यालयाच्या लेटरहेडवर अनुदानित, विनाअनुदानित व शासकीय महाविद्यालयांनी http://www.mu.ac.in/stat/ 28/2014 या वेबसाईट वर उपलब्ध असुन, ती खालील Email वर दि. २८-५-२०१४ पर्यत तात्काळ पाठविण्याची व्यवस्था करावी.

| |
|---|
| Email:- mismumuniversity@gmail.com |

उपकुलसचिव
सांख्यिकी कक्ष/जनसंपर्क विभाग

# प्रमाणपत्र

प्रति,
उपकुलसचिव,
सांख्यिकी कक्ष,
मुबंई विद्यापीठ,
मुबंई – ४०० ०३२.

महोदय,

प्रमाणित करण्यात येते की, आपल्या दि.२३-०५-१४. रोजीच्या पत्रानुसार आमच्या ______________________________ महाविद्यालयाची माहिती शासनाच्या http://mis.dhepune.info/login.aspx या पोर्टलवर भरलेली असून सदरची माहिती परिपुर्ण व अचूक आहे व त्याचबरोबर माहितीमध्ये काही तफावत आढळल्यास त्यास महाविद्यालयाचा प्राचार्य या नात्याने मी स्वत: जबाबदार राहीन.

आपला विश्वासू,

प्राचार्य
सही आणि शिक्का

mk/minal letter/2352014

# महाराष्ट्र शासन

सहसंचालक,

उच्च शिक्षण ,मुंबई विभाग , मुंबई

एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१

www.jdhemumbai.gov.in Tel&Fax No. 022 22656600, 22691528

e-mail : jd@jdhemumbai.gov.in admin@jdhemumbai.gov.in


क्र.सहस/मुंवि/३-लेखा / MIS /२०१३-१४/ 1237 दिनांक : 22/5/14

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानीत,
विना अनुदानीत, कायम विना अनुदानीत महाविद्यालय,

विषय :- **व्यवस्थापकीय माहिती प्रणाली (MIS).**

संदर्भ :-१). सहसचिव यांचे पत्र क्र.सकीर्ण २०१४ / (१५६ /१४ ) मशि ३, दिनांक १७/०५/२०१४.

२). मा.संचालक यांचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/२०१३-१४/एमआयएस/४२२३, दि.२१.५.२०१४.

उपरोक्त विषयास अनुसरुन उच्च शिक्षण संचालनालयासाठी विकसित केलेली एम.आय.एस **(माहिती व्यवस्थापन प्रणाली )** या संदर्भातील आपल्या महाविद्यालयांबाबतची माहिती उपलब्धकरुन देण्यात आलेल्या वेबपोर्टलवर ऑनलाईन बिनचूक भरण्यात आलेली आहे किंवा कसे याची तपासणी करावी व माहिती बिनचूक भरलेली असल्यास या पत्रासोबत जोडण्यात आलेल्या प्रमाणपत्रास साक्षांकित करुन प्रमाणपत्राची एक प्रत मुंबई विद्यापीठास द्यावी व एक प्रत या कार्यालयास सादर करावी. माहिती चुकीची / अपूर्ण असल्यास ती ऑनलाईन पुर्ण करावी व प्रमाणपत्र द्यावे. सदर माहीती अद्ययावत करण्याची प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी शासनाने दि. २८.०५.२०१४ ही अंतिम तारीख दिलेली आहे . आपणामार्फत जर माहीती अपूर्ण व चूकीची भरण्यात आल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

Sd/-
सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.

प्रत :-
१.मा कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.
२.कुलसचिव,
एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई.
**प्रत माहिती व तात्काळ कार्यावाहीसाठी रवाना.**

# प्र मा ण प त्र

**दिनांक :-**

प्रमाणित करण्यात येते, की ________________________________ या महाविद्यालय/ संस्था / विद्यापीठ बाबतची Management Information System of Higher Educational Institution **( माहिती व्यवस्थापन प्रणाली )** या वेबपोर्टलवर भरण्यात आलेली शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ची सर्व माहीती तपासून व खात्रीपूर्वक बिनचूक भरण्यात आलेली आहे.

प्राचार्य

सही व शिक्का